**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. निजलिंगप्पा महादेव इंगळे
९२९, बुधवार पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा ग्रंथालय संचालक,**
ग्रंथालय संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, नगर भवन,
मुंबई-२३

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक,**
नवीन मध्यवर्ती इमारत,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१५/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सोलापूर शहरातील सार्वजनिक वाचनालयांना शासनमान्यता मिळाल्यासंदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. निजलिंगप्पा महादेव इंगळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी आयोगाकडे एकत्रित अपील केले असल्याचे दिसून येते. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे

आवश्यक आहे. अपिलासोबतच्या अन्य कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे यांनी त्यांना माहितीसाठीचे शुल्क रु.८०/- भरणेबाबत कळविले असून त्यानुसार अपीलकर्त्याने आवश्यक तर पैसे पाठवून माहिती प्राप्त करुन घ्यावी. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 22 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.जगन्नाथ मारुती संकपाळ
मु.पो.माले, ता.पन्हाळा,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती पन्हाळा,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत माले, ता.पन्हाळा,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२१/२०१०/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.मारुती संकपाळ यांच्या मिळकतीबाबत माले ग्रामपंचायतीने घर फाळा कर आकारणी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदरचे अपील हे दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.

दि :- 25 JUN 2010

(विजय कुवळेकर)

राज्य माहिती आयुक्त,

पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

अध्यक्ष,
समाजसेवा मंडळ, वाणी चिंचाळे, **अपीलकर्ता**
ता.सांगोला, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,** **उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**श्री.धोंडाप्पा कुंडलिक साखरे** **मूळ अर्जदार**
मु.पो.डोंगरगांव,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७४/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** समाजसेवा मंडळ, वाणी चिंचाळे, ता.सांगोला या संस्थेचे दि.१/१०/१९९२ ते ३१/०३/१९९३ अखेरपर्यंतचे रोजकिर्द, खतावणी, पावती पुस्तके, हिशोब पत्रके, बँकेचे पासबुक व आवक जावक रजिस्टरच्या सत्यप्रती इ. | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे मूळ अर्जदार श्री.धोंडाप्पा कुंडलिक साखरे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या दि.१/०४/२००८ निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यांच्या निर्णयाविरुध्द जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, समाजसेवा मंडळ, वाणी चिंचाळे, यांनी अपील केले आहे. मूळ अर्ज दखलयोग्य ठरत नसल्याने आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१.अपील मान्य करण्यात येत आहे.

२.अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे दि.१/०४/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ आप्पा कुंभार
नवी कुंभार गल्ली, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, अउदा व संवसु मंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,
प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ,पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोपाळ आप्पा कुंभार
नवी कुंभार गल्ली, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.४.२०१० रोजी घेण्यात आली.

मधुमेह या विकाराला शासन निर्णयाप्रमाणे मान्यता असतानाही आपले वैद्यकीय देयक महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने दिलेले नाही. आपण निवृत्त होऊन चार वर्षे झाली, तरी व जवळजवळ १०० अर्ज करूनही आपल्या आर्थिक मागणीची तड लागत नाही. त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटत नाही व त्याबाबतची माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गोपाळ आप्पा कुंभार यांनी केली.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांची मागणी 'महाराष्ट्र राज्य वीज वितरण पारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी व माझे आर्थिक प्रश्न त्वरित सोडवून मिळावेत,' अशी आहे. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
11 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती शेख नसरीन उस्मान तर्फे
ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे,
ॲड. मंगला लक्ष्मण शिंदे व
ॲड.सारिका राऊत
ए-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग,
कर्वे नगर, पुणे-५२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त सेवक वर्ग (जनरल),**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सेवक वर्ग विभाग,**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९८/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुणे महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमिक विद्यालयातील पद भरतीच्या अनुषंगाने एकूण ८ मुद्दयांचा सविस्तर तपशील | |

## विवेचन

श्रीमती शेख नसरीन उस्मान तर्फे ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे, ॲड. मंगला लक्ष्मण शिंदे व ॲड.सारिका राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केलेले आहे. अन्य व्यक्ती तर्फे माहिती मागण्याची /अपील करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. सबब सदर अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 25 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हनुमंत वासुदेव खरात
चव्हाण प्लॉट उपळाई रोड,
बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत बारलोणी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२४/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.अे.पी खंडाळे, ग्रामविकास अधिकारी यांना पदभार दिलेल्या यादीची छायाप्रत व त्यांना अद्याप ज्या बाबी संदर्भातील दप्तर दिले नाही त्याची यादी | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यास दि.५/०९/२००८ व

दि.२०/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये मोफत माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बारलोणी, श्री.चंद्रकांत कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कुर्डुवाडी, श्री.एल.जी.माने यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 21 JUN 2010**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रविंद्रकुमार गोंविद सरवदे
गणेश नगर, माढा, **अपीलकर्ता**
ता.माढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय माढा, ता.माढा,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय माढा, ता.माढा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/६/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/७/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/८/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** माहे जाने २००५ ते माहे जून २००५ या दरम्यान रॉकेलचा कोटा कसा होता, व त्यांचे वितरण कसे केले याबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

सदर अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.रविंद्रकुमार गोंविद सरवदे यांना जिल्हापुरवठा अधिकारी, सोलापूर यांच्याकडून माहे जाने २००५ ते जून २००५ या कालावधीतील रॉकेलचा उपलब्ध कोटा त्याचे वितरण याबाबतची माहिती दिलेली होती. त्यानंतर प्रथम अपिलामध्ये अपीलकर्त्यास दिलेली माहिती व कार्यालयात असलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन निर्णय घेण्यात आला या निर्णयाप्रमाणे लेखी पाहण्यासाठी अपीलकर्ता आले नाहीत अगर त्यांनी कोणतेही लेखी निवेदन दिले नाही. अपीलकर्त्यास माहिती पाहण्यास स्वारस्य नाही. तसेच अपीलकर्त्यास पूर्ण माहिती मिळूनसुध्दा काही विशिष्ट हेतूने अपील केल्याचे दिसून येते, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, जि.सोलापूर यांनी दि.१७/११/२००८ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे. माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, सोलापूर यांनी केलेली कार्यवाही लक्षात घेता व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 25 JUN 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नंदकुमार मनोहर पानसरे
७९०, वेताळ पेठ,
मु.पो. व ता.भोर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश,**
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४३/२०१०/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नंदकुमार मनोहर पानसरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, पुणे यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचा निर्णय योग्य असून अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.आनंद सायबु क्षिरसागर
सुशीलनगर, घर नं.६७,
भारती विद्यापीठासमोर, विजापूर रोड,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/१२/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** एस.एस.सी.विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षा अंतर्गत सोलापूर जिल्हयातील परीक्षकांना देण्यात आलेले मानधन, तसेच परीक्षक नेमणुकी संदर्भातील पत्रव्यवहार | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. सदर अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च

माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांनी अपीलकर्ता श्री.आनंद सायबु क्षिरसागर यांना दिलेले उत्तर योग्य आहे. तसेच उत्तरपत्रिका कोणी तपासल्या, अशा स्वरुपाची माहिती विश्वासाश्रित संबंधांतर्गत असून जाहीर करता येणार नाही.

आयोगाचें आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.मंगल सोमनाथ साळुंखे
कुंभार गल्ली, सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सांगोला , जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९४/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विद्युत कनेक्शन दुसऱ्याच्या जागेतून जाणार असेल तर त्या व्यक्तीचे संमत्तीपत्रक स्टँपपेपरवर घ्यावे अगर साध्या कागदावर घ्यावे, तसेच कनेक्शन आमच्या जागेवरुन का दिले, यासंबंधित माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.३/१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

अपीलकर्त्या सौ.मंगल सोमनाथ साळुंखे यांनी केलेल्या मूळ माहिती अर्जावर सही केली नव्हती. तरी देखील दि.३१/५/२००८ रोजी माहिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सांगोला , जि.सोलापूर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजाराम दामू काळेबाग
मु.पो.अचकदाणी, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय वनअधिकारी,**
भोर जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी प्रादेशिक वनअधिकारी,**
भोर जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०४/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजाराम दामू काळेबाग यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. आयोगाच्या दि. २५/११/२००८ च्या पत्रान्वये सदरहू कागदपत्रे सादर करण्याबाबत अपीलकर्ता श्री.काळेबाग यांना कळविण्यात आले होते. तथापि

अद्यापही त्यांनी आवश्यक कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजाराम दामू काळेबाग
मु.पो.अचकदाणी, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय वनअधिकारी,**
भोर जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी प्रादेशिक वनअधिकारी,**
नसरापूर जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०५/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजाराम दामू काळेबाग यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. आयोगाच्या दि. २५/११/२००८ च्या पत्रान्वये सदरहू कागदपत्रे सादर करण्याबाबत अपीलकर्ता श्री.काळेबाग यांना कळविण्यात आले होते. तथापि

अद्यापही त्यांनी आवश्यक कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रशांत यशवंत इंगवले
५०२, गुरुवार पेठ,
सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय सातारा,

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय सातारा,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१/२०१०/सातारा |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आणेवारी व गुंठेवारी क्षेत्रासंबधीची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.प्रशांत यशवंत इंगवले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन श्री.इंगवले यांच्या याच विषयाबाबतच्या अपिलावर (अपील क्र.६४२/सातारा) यापूर्वी आयोगाने निर्णय दिलेला असून सदरचा निर्णय या अपिलातही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अण्णा तुकाराम राऊत
राऊत सदन, एस.टी.सोसायटी,
एरिया विजापूर रोड, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
उत्तर सोलापूर तहसील कार्यालय,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी निवासी नायब तहसीलदार,**
उत्तर सोलापूर तहसील कार्यालय,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१७/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. अण्णा तुकाराम राऊत यांच्या मालकीच्या प्लॉट नं.४ व शेजारील प्लॉट नं.३ चे क्षेत्र अनाधिकाराने व गैरवापर करुन कमी केल्याबद्दल गंभीर स्वरुपाची तक्रार केलेली असून तिचा समाधानकारक व न्यायोचित निपटारा करुन अर्जदारास दिलासा देणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अण्णा तुकाराम राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा समावेश दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त करण्यात आला होता. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, उत्तर सोलापूर यांच्याकडील कजाप-२/२००० दि.१/०२/२००० नुसार सर्व्हे नं.३६० नवीन ३२/अ/१/२ई १ ते ५ प्लॉटचे मंजूर नकाशाप्रमाणे क्षेत्र कमी झाल्याचे अपीलकर्त्यास दि.५/०६/२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी निवासी नायब

तहसीलदार, उत्तर सोलापूर तहसील कार्यालय, श्री.व्ही.पी.ढगे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याच्या मूळ माहिती-मागणी अर्जानुसार (जोडपत्रअ) अपीलकर्त्याची मूळ मागणी ही त्यांच्या तक्रारीचा निपटारा करण्याविषयीची असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयातही येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भारत गंगाराम आवताडे
मु.पो.कडलस, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०४/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०५/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८/०६/२००८ |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९८-२००८ या कालावधीत शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा केंद्र देण्याबाबतचे निकष | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. या अपिलासोबतची कागदपत्रे पाहता

अपीलकर्ता श्री.भारत गंगाराम आवताडे यांना सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी माहिती दिल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.